MHRG110007792020

# नियमित दिवाणी दावा क्र.४९/२०२० मधील निशाणी क्र.५६ खालील आदेश

(सुधीर मोरे वि. महेंद्र मोरे वगैरे)

वादीने प्रस्तुतचा अर्ज प्रतिवादी यांचे वारस अभिलेखावर आणणेसाठी दाखल केलेला आहे.

२. वादी यांनी प्रस्तुतचा दावा प्रतिवादींविरुध्द वाटपाकरिता व निरंतरचे ताकिदीकरिता दाखल केलेला आहे. सदरचा दावा प्रलंबित असताना प्रतिवादी क्र.४ गेणी सिताराम कांबळे पुर्वाश्रमीचे नाव श्रीम. गेणी बाळु मोरे उर्फ गेनिबाई बाबु कांबळे या दि.०९.०९.२०२४ रोजी मौजे मुंबई येथे राहत्या घरी मयत झाल्या आहेत. प्रतिवादी क्र.४ यांना मृत्यूसमयी मुगला रमेश बाबु कांबळे हे दि.१६.०४.१९९५ रोजी मयत असुन त्यांची पत्नी, मुलगा, मुलगी व काशिनाथ बाबु कांबळे असे कायदेशीर वारस आहेत. प्रतिवादी क्र.४ यांचे वारसांना दाव्याकामी दाखल करुन त्यांचेविरुध्द दावा चालविण्याचा वादीस हक्क आहे. प्रतिवादी क्र.४ यांचे वारसांना दाव्याचे सरनाम्यात प्रतिवादीपणात दाखल करणे आवश्यक आहे अशी विनंती वादी यांनी केलेली आहे.

३. प्रतिवादींनी सदर अर्जावर त्यांचे म्हणणे दाखल करुन असे कथन केले आहे की, सदरचा अर्ज दाव्याकामी वारस रेकॉर्डवर घेण्याकरिता केलेला आहे. सदरचा अर्ज दाखल करण्याकरिता झालेला विलंबाकामी योग्य तो आदेश होण्यास हरकत नाही.

४. निशाणी क्र.५६ कडील अर्ज, त्यावरील म्हणणे व त्या पुष्ट्यर्थ दाखल केलेले प्रतिज्ञापत्र यांचे अवलोकन केले. वादी व प्रतिवादीतर्फे विद्वान

विधीज्ञांचा युक्तिवाद ऐकला. प्रतिवादी मयत असल्याचे त्यांच्या वारसांनी शपथेवर सांगितले आहे. वादीच्या कथनाप्रमाणे प्रतिवादी क्र.४ गेणी सिताराम कांबळे पुर्वाश्रमीचे नाव श्रीम. गेणी बाळु मोरे उर्फ गेनिबाई बाबु कांबळे या दि.०९.०९.२०२४ रोजी मयत झाल्याचे समजते. अर्जात उल्लेख केल्याप्रमाणे त्यांचे वारस हे प्रस्तुत दाव्याचे कामी आवश्यक पक्षकार झालेले आहेत. दाव्याचा गुणदोषांवर निपटारा होणेकरिता तसेच फलित व परिणामकारक हुकूमनामा होणेकरिता प्रस्तुतचा अर्ज मंजूर करणे न्यायोचित ठरते. सबब मी खालीलप्रमाणे आदेश पारित करीत आहे.

## आदेश

१. निशाणी क्र.५६ वरील अर्ज मंजूर करण्यात येत आहे.

२. वादीने अर्जात नमूद केल्याप्रमाणे दुरुस्ती या अर्जाचे आदेशापासून पुढील तारखेपर्यंत करावी व दुरुस्त अर्जाची प्रत हजर करावी.

३. सदर दुरुस्तीची नोंद संगणक प्रणालीमध्ये तसेच दाव्याचे नोंद रजिस्टरमध्ये घेणेत यावी.

SONTAKKE AHILYABAI BALIRAM
Digitally signed by SONTAKKE AHILYABAI BALIRAM
Date: 2025.12.18 11:31:41 +0530

माणगाव. [श्रीमती अ.प्र.मानव(श्रीमती अ. ब. सोनटक्के)]

दिनांकः–१७.१२.२०२५. दिवाणी न्यायाधीश क.स्तर, माणगाव.